# मुंबई ग्राहक पंचायत

सार्वजनिक विश्वस्त न्यास नोंदणी नं. एफ ७००० मुंबई • सोसा. रजि. नं. ४१७/८/जीबीबीएसडी



अध्यक्ष
डॉ. बाळ फोंडके

उपाध्यक्ष
श्रीम. अनुराधा गोरे

कार्याध्यक्ष
ॲड. शिरीष देशपांडे

कार्योपाध्यक्ष
श्री. प्रभाकर गवाणे
श्रीम. अनुराधा देशपांडे

कार्यवाह
श्रीम. अनिता खानोलकर
श्रीम. ज्योती मोडक

खजिनदार
श्री. रविंद्र सहस्रबुद्धे


संदर्भ/ **1134** /मुंग्रापं./२३-२४/अखा

दि. २५ जुलै २०२३

प्रसिध्दीसाठी

## सेतू बांधा रे !

**ज्यांची बाग फुलून आली**
**त्यांनी दोन फुले द्यावीत**

**मातीत ज्यांचे जन्म मळले,**
**त्यांना थोडे उचलून घ्यावे.**

# वंचितांसाठी मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे विशेष पंचायत पेठेचे आयोजन

मुंबई ग्राहक पंचायत ही आज बाजारात दिसणाऱ्या सर्व ग्राहक पेठांची जननी. गेली ४६ वर्षे उचित व्यवहारांचे पालन करत ग्राहक पंचायत पेठांचा हा उपक्रम आज मुंबई आणि मुंबई बाहेरही ग्राहकांच्या उदंड प्रतिसादाने बहरून आला आहे.

सुरुवातीला एका छोट्याशा संकल्पनेतून बहरलेल्या या उपक्रमातून अनेक छोटे-मोठे उत्पादक या पेठेच्या व्यासपीठावर आले, घडले आणि मोठे झाले. व्यवसाय करताना उचित व्यवहाराचे आग्रही पालन करून उत्तम उत्पादन आणि उत्तम व्यवसाय कसा करता येतो याचा वस्तूपाठच या पंचायत पेठांनी छोट्या उत्पादक, उद्योजकांना आणि व्यावसायिकांना घालून दिला. पंचायत पेठांचा हा उपक्रम राबवित असतांना संस्था सामाजिक बांधिलकीचे भान कधीच विसरली नाही. त्यामुळे प्रत्येक पंचायत पेठेत मतीमंद, अंध, आदीवासी वंचित बांधवांच्या उत्पादन विक्रीस उत्तेजन देण्यासाठी काही संस्थांना मुंबई ग्राहक पंचायत मोफत गाळे उपलब्ध करून देत आली आहे.

आज ह्याच सामाजिक बांधिलकीचे भान अधिक व्यापक, अधिक विस्तृत करावे, **"मातीत ज्यांचे जन्म मळले, त्यांना थोडे उचलून घ्यावे"** या भावनेतून मुंबई ग्राहक पंचायत अशा विविध सामाजिक संस्थांसाठी एका **विशेष ग्राहक पंचायत पेठे**चे आयोजन अंधेरी येथे येत्या आक्टोबर मध्ये करत आहे. ह्या संस्था असतील वंचित वर्गासाठी धडपडणाऱ्या, दुर्गम भागात काम करणाऱ्या आदिवासी, अंध,

मतिमंद, अपंग अशा घटकांना सक्षम करू पाहणाऱ्या. आज समाजात अशा अनेक संस्था आपापल्या परीने उत्तम काम करत आहेत. त्यातील काही आपल्याला माहित असतील तर काही अगदी अप्रकाशित, कोणताही गाजावाजा न करता आहे त्या परिस्थितीत काम करतात. त्या त्यांच्या क्षमतेनुसार आपापल्या संस्थेमध्ये जी काही उत्पादने करत असतील / करवून घेत असतील त्या उत्पादनांना मुंबई ग्राहक पंचायत आपल्या पंचायत पेठेच्या व्यासपीठावरून ग्राहकांशी जोडणार आहे. अशा संस्थांना पंचायत पेठेचे व्यासपीठ कोणत्याही प्रकारचे भाडे न आकारता मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय संस्थेने घेतला आहे.

काही संस्थांकडे त्यांच्या संस्थेतील विशेष वर्गाकडून करून घेतलेली उत्तम दर्जाची उत्पादने असतात. परंतु ती बाजारपेठेत आणून विकण्यासाठी लागणारी यंत्रणा आणि मनुष्यबळ अशा संस्थांकडे नसते. हे लक्षात घेऊन मुंबई ग्राहक पंचायतीचे सेवाभावी वृत्तीने काम करणारे कार्यकर्ते विनामोबदला अशा संस्थांच्या उत्पादनांची विक्रीसुध्दा या विशेष पेठेत करून येणारी सर्व रक्कम अशा संस्थांना पावतीसह सुपूर्द करतील.

ज्या संस्थांना मुंबई ग्राहक पंचायतीच्या या विशेष पंचायत पेठेमधे सहभागी व्हायचे असेल त्यांनी संस्थेच्या विहित नमुन्यातील अर्जात माहिती भरून देणे आवश्यक आहे.

वंचित समाजातील "उत्पादक ते ग्राहक" असा थेट सेतू बांधणारी ही अनोखी अशी आगळी, वेगळी ग्राहक पेठ असणार आहे. मुंबईतील "ज्यांची बाग फुलली आहे" असे ग्राहक या पेठेला मोठ्या संख्येने भेट देऊन अशा वंचित समाजातील क्रीयाशील उत्पादक/उद्योजकांना त्यांची उत्पादने विकत घेऊन, त्यांना समाजात मानाने जगण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी त्यांना भरभरून प्रतिसाद देणार आहेत.

ही विशेष ग्राहक पंचायत पेठ अंधेरी पूर्वेकडील **सिंफनी बँक्वेट हॉल**मध्ये आयोजित करण्यात येत आहे. या विशेष पेठेचा कालावधी आहे **दि. २१ आणि २२ ऑक्टोबर २०२३.**

**“आहे रे कडून नाही रे"** कडे जाणारा हा एक छोटासा प्रयत्न सर्वांच्या सहकार्यातून संपन्न करण्याचे संस्थेने ठरविले आहे.

अर्ज भरून देण्याची अंतिम तारीख **सोमवार, १४ ऑगस्ट २०२३** आहे. अर्ज संस्थेच्या **mymgp.org** या संकेत स्थळावरुन प्राप्त करून घेता येईल. अधिक माहितीसाठी कार्योपाध्यक्ष **श्रीम. अनुराधा देशपांडे** यांच्याशी ९८६७८१५६१८ या क्रमांकावर **सकाळी ११ ते सायं ४** या वेळात संपर्क साधावा.

धन्यवाद.



अनिता खानोलकर
कार्यवाह